653

No. L.N.D. [illegible] 1.
Camp Dhasai, 22 February 1945.

To,

Mr. Govind Keshav Kumbhar
Near Virar Post Office, Taluka Bassein.

With reference to your petition dated 29-9-1940, I have to inform you that you are hereby permitted to use the house and the latrine (already built by you as shown by letters H.I.J.K. & L. in the sketch dated 25-1-1941) for non-agriculurual purpose and also you are allowed to form a permanant non-agricultural plot measuring 559 sq. yds as shown with letters A.B.C.D.E.F.G. on the approved sketch of 25-1-41, out of S.No. 350/1-A H.No. 18 situate at Virar in Bassein Taluka on the following conditions in addition to the conditions contained in form M. prescribed by the Land Revenue Rules.

(1) the remaining area of 474-1 sq.yds shall be kept open to the sky as it is and no structure shall be built in this open area without the permission of the Collector.

(2) In lieu of the present agricultural assessment on the plot you shall have to pay N.A. assessment at the rate of Rs.75/- Seventy-five only per acre from 1-8-1940 which shall be guaranteed for a periodof thirty years from 1940-41.

(3) No building on the land shall be substantially repaired during the period of the War without the previous approval of the plans, elevations and specifications by the Executive Engineerm, Thana.

(4) You shal 1 execute a sanad in M form.

(5) No additions and alternations in the present buildins shall be made without the written permission of the Collector.

For further particulars you are referred to the Mamlatdar of Bassein.

A copy of the approved plan is enclosed.

District Deputy Collector,
Bhiwandi Prant, Thana.

::: :::

क्रमांक नपाविा/बांधकाम/सीआर-२१६/८७.
विरार नगरपालिका कार्यालय, विरार.
दिनांक ६/४/१९८७.

वाचा:-

१) श्री. वसंत विठ्ठल पाटील व इतर, ह्यांचा दिनांक १६/१/१९८७ रोजीचा अर्ज.
२) नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग, ठाणे ह्यांचेकडील पत्रक्रमांक विशेम/बांधकाम/विरार-वसई/११०२, दिनांक १०/३/८७.

आदेश:-

१) श्री. वसंत विठ्ठल पाटील व इतर, रा. विरार, वंदनसाररोड पूर्व, ह्यांचे मालकी मौजे विरार, ता. वसई, येथील स. नं. १९ हि. नं. १३, १४ च्या जमिनीत अर्जासोबत जोडलेल्या नकाशाप्रमाणे नियोजित विकास विषयक कामास (राहण्यासाठी उपयोगांत येणा-या इमारतीच्या बांधकामास) परवानगी मागीतली आहे.

२) सदरचे प्लॉटचे एकूण क्षेत्र ८६०.२६८ चौ. मीटर असून, अर्जदार यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरुन (गावचा नमुना नं. ७/१२ चे उतारे) अर्जदार ह्यांनी सदर प्लॉटमध्ये ८५५.९१३ चौ. मीटर इतक्या जागेत बांधकामाची परवानगी (तळमजला अधिक दोन मजले) मागितली आहे.

३) अर्जदाराचा सदरचा अर्ज व त्यासोबतचे बांधकाम दर्शविणारे नकाशे सहाय्यक, संचालक नगर रचना, ठाणे ह्यांचेकडे तपासणीसाठी व अभिप्रायासाठी इकडील कार्यालयांतून पाठविणेत आले असता त्यांनी त्यांचे कडील पत्र क्रमांक विशेम/बांधकाम/विरार/वसई/११०२, दिनांक १०/३/८७ अन्वये अर्जदारास सदर पत्रांत नमूद केलेल्या शर्तींस आधिन राहून अर्जदाराने सादर केलेल्या बांधकाम व स्थलदर्शक नकाशाप्रमाणे बांधकाम करण्यास परवानगी देण्याची शिफारस केली आहे.

४) वर नमूद केलेल्या सर्व बाबीं विचारांत घेता अर्जदार यांस महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ मधील कलम, १८९ व त्याप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील कलम, ४५ या तरतूदीस अधिन राहून या सोबत मंजूर करण्यांत आलेल्या नकाशाप्रमाणे इमारती व बांधकाम ह्यासाठी खालील नमूद केलेल्याशर्तींस बंधनकारक राहूनच इकडील कार्यालयांतून परवानगी देण्यांत येत आहे.

१) वरिल जागेचा व नियोजित इमारतीचा वापर रहीवातासाठीच करण्यांत यावा व बांधकाम सोबत जोडलेल्या मंजूर नकाशाप्रमाणे असावे.

२) स्थलदर्शक नकाशावर दाखविल्याप्रमाणे नियोजित बांधकामापासून पुढील मागील व बाजूंची अंतरे प्रत्यक्षांत जागेवर रकिमानअसली पाहिजे.

३) नियोजित बांधकाम हे तळमजला व त्यावर दोन मजले या पेक्षा जास्त असू नये.

४) नियोजित बांधकामाचे भूखंडातील अस्तित्वातील बांधकामे धरुन एकूण क्षेत्र भूखंडाच्या निव्वळ क्षेत्राच्या १/३ इतिके प्रत्यक्ष जागेवर कमाल राहिले पाहिजेत.

नियोजित इमारतीसाठी आवश्यक असणा-या पाण्याची सोय तसेच सांडपाण्याची सोय व मैला निर्मूलनाची व्यवस्था तशी पर्यायी व्यवस्था न असल्यास प्रत्यक्ष वापरापूर्वी अर्जदाराने केली पाहिजे. जलधित तंडात बांधावा.

६) नियोजित बांधकामांत मंजूरी पेक्षा वेगळे ई बदल करावयाचे असल्यास किंवा वापर बदलावयाचा असल्यास इकडील कार्यालयाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

७) मालकी हक्काची छाननी तसेच वरिल जागेचा मार्गअसल्याची खात्री महसूल विभागाने करावी.

८) दुस-याचे अथवा नगरपरिषदेच्या जागेंत अतिक्रमण करु नये.

९) परवानगी मिळालेल्या बांधकामास परवानगी मिळण्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या आंत सुरु करावयास पाहिजे. पूर्ण एक वर्षाच्या आंत बांधकामास सुरुवात न केल्यास दिलेली परवानगी रद्द समज - ण्यांत येईल.

१०) इमारतीचे बांधकाम पूर्ण होताच इमारतीचे बांधकाम लोकांना राहण्यासाठी योग्य असल्याबाबत अधिकृत आर्किटेक्टचा दाखला (सर्टिफिकेट) इकडील नगरपरिषदेकडे हजर करावे मगच इमारतीमध्ये भाडोत्री अथवा लोकांना राहावयास देण्यांत यावे.

११) परवानगी धारकाने सुधारित बांधकाम नियंत्रण नियम, १९८१ च्या नियम ४ ६ अन्वये बांधकाम करणे त्यांस बंधनकारक राहील. तसेच रस्ता व गटाराचे काम त्यांनी इमारत बांधकाम करण्यापूर्वीच सुरु करावे.

..... २ .....

१२) अर्जदाराने दाखल केलेल्या नकाशानुसार त्यांनी स्वतंत्रपणे भ्र गटाराची व्यवस्था करावी. तसेच इमारतीकडे जाणारा अप्रोज रोड बांधकाम सुरू करण्यापूर्वी तयार करावी. सदरील बांधकाम करताना नगरपालिका सुधारित बांधकाम उपविधी व विकास नियंत्रण नियमावलीतील नियम, २०.३.३ मधील अनुक्रमांक ३ चे तंतो तंत पालन करणे बंधनकारक राहील.

१३) परवानगी मिळालेल्या बांधकामास परवानगी मिळाल्याचा तारखेपासून संपूर्ण एक वर्षाच्या आंत सुरू करावयास पाहिजे. पूर्ण वर्षाच्या आंत बांधकामास सुरुवात न केल्यास दिलेली परवानगी रद्द समजण्यांत येईल. (सोबत कमेंसमेंटसर्टिफिकेट सही शिक्यानिशी जोडली आहे.)

१४) परवानगी मिळालेले बांधकाम परवानगी मिळाल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या आंत सुरू केलेले असेल मात्र पूर्ण तीन वर्षाच्या आंत बांधकाम पूर्ण न केल्यास दिलेली परवानगी रद्द समजण्यांत येईल.

१५) वरिल पैकी क्रमांक.१३ व १४ प्रमाणे मुदतीत बांधकाम सुरू करता आले नाही आणि/किंवा मुदतीत बांधकाम पूर्ण करता आले नाही तर त्यासाठी पुन्हा परवानगी घेऊन त्यास बांधकामास सुरुवात/पूर्ण करता येईल. मात्र हा निर्णय नगरपालिकेच्या अधिकारांत राहील.

१६) बिनशेती परवानगी घेणे याची जबाबदारी अर्जदारावर राहील.

१७) वरिल पैकी कोणत्याही अटींचा भंग झाल्यास सदरची परवानगी रद्द झाली आहे. असे समजण्यांत येईल.

मुख्याधिकारी
विरार नगरपालिका परिषद

प्रशासक,
विरार नगरपालिका परिषद,
विरार

प्रति,

1 श्री. वसंत विठ्ठल पाटील, व इतर,
रा. विरार पूर्व, वंदनसाररोड,
ता. वसई, जिल्हा-ठाणे.

प्रत:-

१) बांधकाम परिक्षक नगरपरिषद, विरार.

२) वसुली विभाग, नगरपरिषद, विरार
हयाचेकडे जरूर त्यापुढील कार्यवाहीसाठी रवाना.